# विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती

## २०१५-२०१६

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

### गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी विद्यापीठामार्फत राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांसंबंधीचा

# पाचवा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक        डिसेंबर २०१५ रोजी सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, नागपूर
डिसेंबर, २०१५

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती
२०१५-२०१६
(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी विद्यापीठामार्फत राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांसंबंधीचा
पाचवा अहवाल

एचबी २१५५-१

## विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती
## (२०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

(१) श्री. बाळासाहेब सानप, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(३) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(४) श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.
(५) श्री. महेश चौघुले, वि.स.स.
(६) डॉ. तुषार राठोड, वि.स.स.
(७) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(८) श्री. सुरेश धानोरकर, वि.स.स.
(९) श्री. कुणाल पाटील, वि.स.स.
(१०) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.
(११) श्री. भाऊसाहेब पाटील-चिकटगांवकर, वि.स.स.
(१२) श्री. महादेव जानकर, वि.प.स.
(१३) श्री. रामराव वडकुते, वि.प.स.
(१४) श्री. राजेंद्र जैन, वि.प.स.
(१५) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव,
(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,
(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

---

सन २०१५-२०१६ या वर्षाकरिता मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा व मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी अनुक्रमे दिनांक १ मे, २०१५ व दिनांक २१ मे, २०१५ रोजी विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती नामनिर्देशित केली आहे.





## विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती
## (२०१३-२०१४)

**समिती प्रमुख**

(१) डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. अशोक जाधव, वि.स.स.
(३) श्री. सिताराम घनदाट, वि.स.स.
(४) श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.
(५) श्री. शंकरराव गडाख, वि.स.स.
(६) श्री. गणपत गायकवाड, वि.स.स.
(७) श्री. पृथ्वीराज साठे, वि.स.स.
(८) श्री. प्रकाश (अण्णा) शेंडगे, वि.स.स.
(९) श्री. विजयकुमार देशमुख, वि.स.स.
(१०) श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स.
(११) श्री. संजय (बंडू) जाधव, वि.स.स.
(१२) श्री. विजय सावंत, वि.प.स.
(१३) श्री. मुझफ्फर हुसेन, वि.प.स.
(१४) श्री. राम पंडागळे, वि.प.स.
(१५) श्री. भगवानराव साळुंखे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. जितेंद्र भोळे, उप सचिव,
(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,
(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | विषय | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ... | (सात) |
| २ | अहवाल | ... | १ |
| ३ | परिशिष्ट " एक "<br>(गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथील कार्यालयास दिनांक २३ सप्टेंबर २०१३ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेली माहिती.) | ... | ९ |
| ४ | परिशिष्ट " दोन "<br>(दिनांक ७ जुलै २०१५ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेली माहिती.) | ... | २७ |
| ५ | परिशिष्ट " तीन "<br>(समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त) | ... | ४१ |




## प्रस्तावना

मी विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा (सन २०१५-२०१६) **पाचवा अहवाल** सभागृहास सादर करीत आहे.

सन २०१५-२०१६ या वर्षासाठी विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती दिनांक २२ मे, २०१५ रोजी गठित झाली.

विधानसभा नियमावलीतील नियम २३८ अन्वये या समितीकडे खालीलप्रमाणे कामे सोपविण्यात आली आहेत :—

(एक) विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणासाठी असलेल्या राज्य शासनाच्या विविध योजनांचे परीक्षण करणे आणि राज्य शासनाने, त्यासंबंधात काय उपाययोजना करावी या विषयाची माहिती दोन्ही सभागृहांना सादर करणे;

(दोन) राज्य शासनाने आपल्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये व पदांवर (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, सांविधिक आणि निमसरकारी संस्था यातील नेमणूका धरून) विमुक्त जाती व भटक्या जमाती यांना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे यासाठी केलेल्या उपाययोजनांचे परीक्षण करणे;

(तीन) राज्य शासनाच्या कक्षेत येणा-या विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणासंबंधातील सर्व बाबींवर सर्वसाधारणतः विचारविनिमय करणे आणि दोन्ही सभागृहांना त्याबाबत अहवाल देणे;

(चार) समितीने सुचविलेल्या उपाययोजनांबाबत राज्य शासनाने केलेल्या कार्यवाहीविषयी दोन्ही सभागृहांना माहिती देणे;

(पाच) सभागृहाने किवा अध्यक्षांनी समितीकडे विनिर्देशपूर्वक निर्दिष्ट केलेल्या बाबींचे परीक्षण करणे.

सन २०१३-२०१४ या वर्षासाठी गठित केलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांसंदर्भात गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे दिनांक २३ सप्टेंबर, २०१३ रोजी भेट देऊन विद्यापीठाचे कुलसचिव व संबंधित अधिका-यांशी चर्चा केली.

समितीला प्रश्नावलीच्या संदर्भात पुरविलेल्या लेखी माहितीच्या आधारे व समितीने कार्यालयास दिलेल्या भेटीच्या वेळी अधिका-यांनी समितीला दिलेल्या माहितीच्या आधारे अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ७ जुलै, २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग व सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मागासवर्ग कक्ष) यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिवांनी दिलेल्या माहितीचा सर्वंकष विचार करून समितीने त्या संदर्भातील आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

अहवालातील परिशिष्ट "एक" व "दोन" मध्ये गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती तसेच परिशिष्ट "तीन" मध्ये समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त समाविष्ट करण्यात आले आहे. समितीने दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५ रोजी प्रारुप अहवालावर विचार करून तो संमत केला.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या कार्यालयातील संबंधित अधिकारी आणि प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग व सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मागासवर्ग कक्ष) यांनी साक्षीच्या वेळी समितीसमोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती देऊन सहकार्य केल्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

**विधान भवन :** **बाळासाहेब सानप,**
मुंबई, समिती प्रमुख,
दिनांक २३ नोव्हेंबर २०१५. विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती.



## अहवाल

## गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र विधानमंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने पाठविलेल्या प्रश्नावलीनुसार गोंडवाना विद्यापीठाकडून समितीस लेखी माहिती प्राप्त झाली. सदर माहितीच्या अनुषंगाने समितीने गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या कार्यालयास दिनांक २३ सप्टेंबर, २०१३ रोजी भेट देऊन विद्यापीठाचे कुलसचिव व संबंधित अधिकारी यांच्याकडून विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांबाबतची माहिती घेतली.

समितीने, गोंडवाना विद्यापीठाची स्थापना कधी करण्यात आली, गोंडवाना विद्यापीठात एकूण किती पदे मंजूर आहेत, त्यामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी एकूण किती पदे आरक्षित आहेत, त्यापैकी किती पदे भरली आहेत व किती पदे रिक्त आहेत, याबाबत माहिती देण्यास सांगितले असता विद्यापीठाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खालीलप्रमाणे माहिती दिली.

गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाची स्थापना दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी करण्यात आली. विद्यापीठाचे विधीवत कामकाज दिनांक २ ऑक्टोबर, २०११ पासून सुरू झाले. गोंडवाना विद्यापीठातील वर्ग-अ मध्ये ११ पदे, वर्ग-ब मध्ये १० पदे, वर्ग-क मध्ये ८८ पदे, आणि वर्ग-ड मध्ये ५१ पदे अशी एकूण १६० पदे मंजूर आहेत. वर्ग-ड मधील ५१ पदे नागपूर विद्यापीठाकडे अतिरिक्त झाली होती, ही अतिरिक्त पदे जसजशी रिक्त होतील तसतशी ती गोंडवाना विद्यापीठाला हस्तांतरित करण्याच्या अटीवर मंजूर केलेली आहेत. गट-अ संवर्गात एकूण ११ पदे आहेत. त्यामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी एकही पद आरक्षित नसल्यामुळे पद भरण्याचा प्रश्न येत नाही. गट-ब मध्ये एकूण १० पदे मंजूर आहेत. यामध्ये स्वीय सहायक १, अधीक्षक ७, असिस्टंट प्रोग्रामर २ अशी एकूण १० पदे आहेत. रोस्टरनुसार विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी एकही पद आरक्षित नाही. गट-क मध्ये एकूण ८८ पदे मंजूर असून त्यापैकी विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी असलेली २ पदे भरलेली आहेत. तसेच गट-ड मध्ये ५१ पदे मंजूर आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठात जी पदे अतिरिक्त झाली होती, ती पदे गोंडवाना विद्यापीठाकडे हस्तांतरित करण्याबाबत आदेश दिलेला आहे. या ५१ पदांपैकी ७ पदे रिक्त आहेत. हस्तांतरित केलेली ४३ पदे गोंडवाना विद्यापीठाकडून भरण्यात आली आहेत. शिपाई संवर्गात विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी दोन पदे आरक्षित करण्यात आली होती. सदरहू दोन्ही पदे भरण्यात आलेली आहेत. विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी विद्यापीठात १६० पदे मंजूर केली होती ती नियमानुसार भरलेली आहेत.

समितीने, एकूण ८८ पदे असतील तर विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गासाठी किती टक्के आरक्षण येते. ही सर्व पदे वर्ग-क मधील आहेत. वर्ग-क मधील पदे भरताना कोणते धोरण अवलंबिले जाते, अशी विचारणा केली असता सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांनी विदित केले की, विद्यापीठाकडे आकृतीबंधानुसार जसी पदे मंजूर असतील त्याप्रमाणे पदे मंजूर करून दिली जातात.

समितीने, सरळ सेवेने भरलेल्या ६३ पदांकरिता विद्यापीठाने एकाच वेळी जाहिरात दिलेली होती काय, ही पदे ८ टक्के प्रमाणे भरली काय, याबाबत विचारणा केली असता मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, ही जरी वर्ग-क मधील पदे असली तरी सामान्य प्रशासन विभागाचा संवर्गनिहाय आरक्षण असल्यामुळे निवड श्रेणी लिपिकाची वेतनश्रेणी ९३०० आणि ४३०० ग्रेड-पे आहे. उच्च श्रेणी लिपिकाची ५२०० आणि २४०० ग्रेड-पे आहे. कनिष्ठ लिपिकाची ५२०० आणि १९०० ग्रेड-पे आहे. संवर्गनिहाय आरक्षण असल्यामुळे पदे भरलेली आहेत.

समितीने, विद्यापीठात देण्यात येणा-या पदोन्नतीच्या संदर्भात समितीला माहिती देण्यास सांगितले असता समितीस माहिती मिळाली की, पदोन्नती देण्यासंदर्भात एकाच पदावर ३ वर्षे काम करण्याचा निकष असल्यामुळे तसेच गोंडवाना विद्यापीठ नवीन असल्यामुळे विद्यापीठात काम करणा-या उमेदवारांची सेवा ३ वर्षे पूर्ण होताच त्यांना पदोन्नती दिली जाणार आहे. अशा पद्धतीने १६० पदांचे सरळसेवा आणि पदोन्नतीसाठी विद्यापीठाने रोस्टर तयार केले असून त्यास सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), नागपूर तसेच वर्ग-१ आणि वर्ग-२ च्या पदांसाठी सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांनी रोस्टरला मान्यता दिलेली आहे. ही सर्व पदे भरण्यात आलेली आहेत.

समितीने, विद्यापीठाशी किती महाविद्यालये संलग्न आहेत, याची माहिती देण्यास सांगितले असता मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी, विद्यापीठाशी संलग्न २१४ महाविद्यालये आहेत. गोंडवाना विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर येथे ब-याच अडचणी आल्या होत्या. मागासवर्ग कक्षाकडून आम्ही रेकॉर्ड मागत होतो. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, तसेच सामान्य प्रशासन विभागानेही त्यांना पत्र दिले होते. तरीदेखील नागपूर विद्यापीठाने त्यावेळी गोंडवाना विद्यापीठाकडे रेकॉर्ड हस्तांतरित केलेले नाही. ज्या कॉलेजवर अधिव्याख्यात्यांची पदे रिक्त आहेत, तेथे विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी जी पदे भरणे आवश्यक आहेत, त्यास सहसंचालक, नागपूर विभाग यांनी मान्यता दिलेली आहे. विद्यापीठाकडे नोकरभरतीसाठी जसे रोस्टर असते, तसे रोस्टर महाविद्यालयाकडेही असते. महाविद्यालयाकडून रोस्टरची प्रमाणित प्रत घेऊन त्यास शासनाची मान्यता घेऊन पदे भरली जात आहेत. नागपूर विद्यापीठाकडून २१४ महाविद्यालयांचे मूळ रेकॉर्ड या विद्यापीठाला मिळणे आवश्यक आहे अशी माहिती समितीला दिली.



समितीने, नागपूर विद्यापीठाने अद्यापपर्यंत तुम्हाला हे रेकॉर्ड दिलेले नाही काय, असा प्रश्न केला असता सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांनी विदित केले की, विद्यापीठाच्या अंतर्गत जी महाविद्यालये होती त्यांची प्राथमिक तपासणी विद्यापीठाने करावयाची होती आणि अंतिम तपासणी मागासवर्गीय कक्षाकडून करावयाची होती. जुने रेकॉर्ड नागपूर विद्यापीठ देईल तेव्हाच ही कार्यवाही करता येईल. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी पुढे समितीस अशी माहिती दिली की, विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मान्यता मिळाल्यानंतर येथे मागासवर्गीय कक्ष स्थापन झाला. सन १९९६ च्या शासन निर्णयाप्रमाणे वर्ग-३ आणि वर्ग-४ चे रोस्टर विद्यापीठाने तयार करावयाचे आणि मागावर्गीय कक्षाकडून ते प्रमाणित करून घ्यायचे अशी पद्धत आहे. त्याचप्रमाणे वर्ग-१ आणि वर्ग-२ या संवर्गातील पदांची विद्यापीठाकडून प्राथमिक तपासणी करावयाची असते, त्यानंतर सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांचेकडून अंतिम तपासणी करावयाची असते. रोस्टर कोणी तयार करायचे, प्राथमिक तपासणी कोणी करायची आणि त्यानंतर अंतिम तपासणी कोणी करायची याबाबतचा उल्लेख दिनांक ५ नोव्हेंबर २००९ रोजीच्या शासन निर्णयात केलेला आहे.

समितीने, अनुदानित महाविद्यालये किती व विनाअनुदानित महाविद्यालये किती आहेत अशी विचारणा केली असता संचालकांनी, १७७ महाविद्यालयांपैकी ६४ महाविद्यालये अनुदानित आहेत. विनाअनुदानित महाविद्यालयांची संख्या मोठ्या प्रमाणात असून त्यांची संख्या जवळपास १५० आहे अशी माहिती दिली. त्यानंतर समितीने ३५ प्राध्यापक आणि २६ शिक्षकेतर पदांना मान्यता दिलेली आहे काय अशी विचारणा केली असता, प्राध्यापक पदाला मान्यता दिलेली नाही. सन २००४ पासून नागपूर विद्यापीठाने पदव्युत्तर विभाग सुरू केलेला आहे. हे काम तासिका बेसिसवर सुरू आहे असे संचालकांनी सांगितले. यावर विद्यापीठात शैक्षणिक कामकाज व्यवस्थित पार पाडता यावे याकरिता ३५ प्राध्यापक आणि २६ शिक्षकेतर कर्मचारी मिळण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा असे समितीने सांगितले. विद्यापीठात पदव्युत्तर विभागामध्ये एकूण किती विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना कोणते विषय शिकविले जातात असा प्रश्न समितीने केला असता, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, विद्यापीठात पदव्युत्तर विभागात एकूण २१ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांना इंग्रजी, मराठी, वाणीज्य, गणित असे विषय तासिका बेसिसवर शिकविले जातात.

समितीने, मॉडेल कॉलेजबाबतची सद्यःस्थिती काय आहे, मॉडेल कॉलेज गोंडवाना विद्यापीठाकडे केव्हा हस्तांतर होणार आहे अशी विचारणा केली असता संचालकांनी विदित केले की, मॉडेल कॉलेज हे नागपूर विद्यापीठाकडे आहे. प्रत्येक विषयासाठी किमान एक प्रोफेसर असल्याशिवाय विद्यापीठ अनुदान आयोगाकडून तसे प्रमाणपत्र मिळत नाही. विद्यापीठाची स्वतःची इमारत असल्याशिवाय इतर मूलभूत सुविधा देखील मिळत नाहीत. त्यामुळे प्रत्येक विषयासाठी कमीत कमी एक तरी प्रोफेसर उपलब्ध करून देण्यासंदर्भात युजीसीकडे प्रस्ताव दिलेला आहे.

समितीने, विद्यापीठात कार्यरत असणा-या अधिकारी आणि कर्मचा-यांची जात पडताळणी पूर्ण झालेली आहे काय अशी विचारणा केली असता मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, विद्यापीठात कार्यरत असणा-या सर्व अधिकारी आणि कर्मचा-यांची जात पडताळणी झालेली आहे. एखादा उमेदवार विद्यापीठात रुजू झाल्यानंतर त्याला जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी ६ महिन्यांचा अवधी दिला जातो.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने गोंडवाना विद्यापीठास दिनांक २३ सप्टेंबर २०१३ रोजी दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १० जून २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली होती. सदर साक्षीच्यावेळी विद्यापीठाने समितीला अद्ययावत माहिती न देता जुनीच व अपूर्ण माहिती दिल्याने समितीने नाराजी व्यक्त केली व पुढच्या बैठकीच्या वेळी दिनांक ७ जुलै २०१५रोजी अद्ययावत माहितीसह उपस्थित रहावे असे विभागाला निदेशित केले.

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने विधान भवन, मुंबई येथे दिनांक १० जून २०१५ रोजी घेतलेल्या बैठकीच्या वेळी समितीला आ वासित केलेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ७ जुलै २०१५ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली होती.

समितीने, गोंडवाना विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर नागपूर विद्यापीठाकडून किती महाविद्यालये व कर्मचारीवृंद गोंडवाना विद्यापीठाकडे प्रशासकीय कामकाजाकरिता वर्ग करण्यात आला अशी विचारणा केली असता प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी विदित केले की, गोंडवाना विद्यापीठाशी एकूण २३६ महाविद्यालये संलग्न आहेत तसेच शिक्षकेतर कर्मचा-यांची १७० पदे मंजूर आहेत. त्यापैकी ११८ पदे सरळसेवेने भरली आहेत. नागपूर विद्यापीठाकडून गोंडवाना विद्यापीठाकडे वर्ग-४ ची ५१ पदे वर्ग करण्यात आली. विद्यापीठात वर्ग-४ मध्ये विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण प्रवर्गातील २ पदांचा अनुशेष आहे. तसेच या प्रवर्गातील शिक्षकांची ३ पदे रिक्त आहेत. गोंडवाना विद्यापीठ नवीन असल्यामुळे शिक्षकेतर पदांची भरती सुरू व्हावयाची आहे. यामुळे ३ पदांचा अनुशेष राहिला आहे. राज्याच्या अनुशेषासंदर्भात शासनाने दिनांक २२ जानेवारी २०१४ रोजी आदेश जारी केले होते. त्यात पदनिहाय आरक्षणाऐवजी संवर्गनिहाय आरक्षण ठेवण्यात आले होते. परंतु नागपूर उच्च न्यायालयाने सदर आदेशाबाबत फेरविचार करावा असे आदेश दिले होते. यामुळे उक्त आदेशाला स्थगिती देण्यात आली. या संदर्भात विधी व न्याय विभागाकडे सविस्तर प्रस्ताव पाठविला आहे. याबाबतीत निर्णय झाल्यानंतर संपूर्ण राज्यात कार्यवाही केली जाईल. समितीने विद्यापीठ स्तरांवर कुल सचिव, परीक्षा नियंत्रक, विद्यापीठ ग्रंथपाल, वित्त व लेखा अधिकारी या पदांवर नियुक्ती करताना कोणती पद्धत अवलंबविण्यात येते याबाबत विचारणा केली असता, ही पदे सांविधानिक आहेत. कायद्यानुसार सदर पदे भरण्याची प्रक्रिया केली जाते. कुलगुरू सदर पदे भरण्यासाठी कायद्यानुसार समिती गठित करतात. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियमाच्या कलम १७ नुसार ही पदे भरण्यात येतात. याच धर्तीवर कुल सचिव, परीक्षा नियंत्रक, विद्यापीठ ग्रंथपाल, वित्त व लेखा अधिका-यांची पदे भरण्याची कार्यवाही केली जाते अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांनी समितीस दिली.



समितीने, विद्यापीठात पदोन्नती देण्यासंबंधी 'निवड समिती' गठित का करण्यात आली नाही असा प्रश्न केला असता विद्यापीठात सरळसेवा भरतीसाठी समिती गठित केली आहे. गोंडवाना विद्यापीठ नव्याने सुरू झाल्यामुळे ३ वर्षानंतर पदोन्नतीची कार्यवाही सुरू होते. त्यानुसार निवड समिती गठित करावयाची कार्यवाही सुरू आहे. वर्ग-३ व वर्ग-४ चे रोस्टर तपासून मागासवर्ग कक्ष, सहायक आयुक्त यांच्याकडे पाठविले आहे. मागासवर्ग कक्षाकडून रोस्टरला मंजुरी मिळाल्यानंतर विद्यापीठाकडून निवड समिती गठित केली जाईल व पदांची भरती केली जाईल असे प्रधान सचिवांकडून विदित करण्यात आले.

समितीने, मॉडेल कॉलेजबाबतची सद्यःस्थिती व त्यासाठी कोणत्या अटी व शर्ती आहेत याची माहिती विचारली असता प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांनी विदित केले की, केंद्र शासनाने सन २०११ मध्ये मॉडेल कॉलेजची संकल्पना तयार केली. ज्या जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय नोंदणीपेक्षा कमी रेशो असतो, अशा जिल्ह्यांमध्ये मॉडेल कॉलेजेस सुरू केली जातात. राष्ट्रीय व महाराष्ट्राच्या रेशोपेक्षा गडचिरोली जिल्ह्याचा रेशो खूप कमी आहे. भारताचा २१.०१ टक्के, महाराष्ट्राचा २५.६ टक्के आणि गडचिरोली जिल्ह्याचा १५.४३ टक्के रेशो आहे. यामुळे शासनाने गडचिरोली जिल्ह्यात मॉडेल कॉलेज स्थापन करण्याचा निर्णय घेतला. सदर कॉलेज स्थापन करण्याकरिता रुपये ८ कोटी एवढ्या रकमेची तरतूद करावी लागणार आहे. त्यापैकी २.६७ कोटी रुपये विद्यापीठ अनुदान आयोगाने आणि उर्वरित ५.३३ कोटी रुपये राज्य शासनाने द्यावयाचे आहेत. मॉडेल कॉलेज सुरू

करण्याकरिता विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियमाच्या कलम (१२) नुसार मान्यता असली पाहिजे, ही पहिली अट आहे. नागपूर विद्यापीठ असताना शासनाने मॉडेल कॉलेज मंजूर केले आहे. परंतु गडचिरोली येथील मॉडेल कॉलेजला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून रजिस्ट्रेशन प्राप्त झालेले नाही. त्यामुळे गडचिरोलीमध्ये भाड्याच्या इमारतीमध्ये मॉडेल कॉलेज सुरू आहे. गडचिरोली येथील भूखंड क्रमांक ६०२ मधील ३.४६ हेक्टर जमिनीची मोजणी पूर्ण करून शासनाकडे लवकरात लवकर प्रस्ताव पाठविण्यात येईल. त्यानंतर सदर जागा मॉडेल कॉलेजला देऊन कॅपिटल एक्स्पेंडिचर पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. सदर मॉडेल कॉलेज सन २०११ पासून सुरू असून तेथे बी.ए. आणि बी.बी.ए. च्या प्रथम आणि तृतीय वर्षांचा अभ्यासक्रम सुरू आहे. सध्या भाड्याच्या इमारतीमध्ये मॉडेल कॉलेज सुरू असल्याने सदर कॉलेजकरिता भूखंड मिळविणे हा मूळ प्रश्न आहे. दोन विद्यापीठांमध्ये असलेली तांत्रिक अडचण लवकरात लवकर सोडविली जाईल. ज्या जिल्ह्यांमध्ये उच्च शिक्षणाचे राष्ट्रीय प्रमाण कमी आहे, त्या जिल्ह्यामध्ये उच्च शिक्षणाच्या विद्यार्थ्यांची संख्या वाढावी, याकरिता मॉडेल कॉलेजेस सुरू केली जातात.

समितीने, गोंडवाना विद्यापीठांतर्गत येणा-या विविध महाविद्यालयांतील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील शिक्षकांची ६७ व शिक्षकेतर कर्मचा-यांची १६ पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत, सदर अनुशेष कधी पूर्ण करण्यात येईल, अशी विचारणा केली असता प्रधान सचिवांनी विदित केले की, या संदर्भात कार्यवाही करण्यासाठी विभागाचे उप सचिव आणि अवर सचिवांनी नागपूर आणि गोंडवाना विद्यापीठासंबंधी संयुक्त बैठक घेतली. नागपूर विद्यापीठाने सर्व रेकॉर्ड दिले होते. त्यानंतर परिपत्रक काढून सर्व कॉलेजेसच्या संदर्भात गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात २-२ दिवस कॅम्प घेतले होते. मात्र दिनांक २२ जानेवारी २०१४ रोजीच्या शासन निर्णयामुळे शिक्षकेतर पदांचा अनुशेष दिसत आहे.

समितीने, विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालये यांच्यामार्फत विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाकरिता देण्यात येणा-या सोयीसुविधा व शिष्यवृत्तीबाबत माहिती विचारली असता प्रधान सचिवांनी विदित केले की, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीशी संलग्नित चंद्रपूर जिल्ह्यामधील महाविद्यालयांमध्ये सन २०१२-१३ मध्ये ४७२८, सन २०१३-१४ मध्ये ४३९०, सन २०१४-१५ मध्ये ४६८६ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. त्याचप्रमाणे गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीशी संलग्नित गडचिरोली जिल्ह्यामधील महाविद्यालयांमध्ये सन २०१२-१३ मध्ये २४४१, सन २०१३-१४ मध्ये २४७४ आणि सन २०१४-१५ मध्ये ६५४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. यासंदर्भात विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने माहिती घेतली जाते. त्यानंतर सहायक आयुक्तांकडून विद्यार्थ्यांना



शिष्यवृत्ती दिली जाते. ही सर्व माहिती सहायक आयुक्तांकडून प्राप्त करून घेतली आहे. दरवर्षी अंदाजे २४०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. यावर्षी म्हणजेच सन २०१४-१५ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये ६५४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली आहे तर १८१० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे बाकी आहे. परंतु काही विद्यार्थ्यांनी मार्च महिन्यानंतर फॉर्म भरल्यामुळे शिष्यवृत्ती देणे प्रलंबित राहते. काही महाविद्यालये फॉर्मची हार्डकॉपी मार्च महिन्यापूर्वी सादर करतात तर काही महाविद्यालय मार्च महिन्यानंतर सादर करतात. मार्च महिन्यापर्यंत ऑनलाईन फॉर्म भरलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. यावर्षी आणखी १८१० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती द्यावयाची आहे. प्रत्येक वर्षी २ हजारापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते.

समितीने, गोंडवाना विद्यापीठात विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांची संख्या किती आहे, तसेच विकासाच्या संदर्भात विद्यापीठाच्या कोणत्या योजना आहेत, अशी विचारणा केली असता कुलसचिवांनी विदित केले की, सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात चंद्रपूरमध्ये २०६३ आणि गडचिरोलीमध्ये ७८३ अशी एकूण २८४६ विद्यार्थी संख्या आहे. सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात चंद्रपूरमध्ये ३२७५ आणि गडचिरोलीमध्ये १२९८ अशी एकूण ४५७३ विद्यार्थी संख्या आहे. सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात चंद्रपूरमध्ये ४५९५ आणि गडचिरोलीमध्ये १७१० अशी एकूण ६३०५ विद्यार्थी संख्या आहे. प्रधान सचिवांनी असेही विदित केले की विभागाने ऑन लाईन प्रणाली विकसित करण्याबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. विद्यापीठाकडे सध्या १० एकर जागा आहे. आणखी ४० एकर जागा संपादित करण्याचा प्रस्ताव आहे. शासनाने त्यासाठी १.५० कोटी रुपये दिलेले आहेत. त्यासाठी आता ११ कोटी रुपयांचा सुधारित प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. गोंडवाना विद्यापीठात नियमित कुलगुरू मिळाल्यानंतर या विद्यापीठाला अधिक गती मिळेल. येणा-या दोन महिन्यात नियमित कुलगुरुंची निवड होईल. त्यानंतर ३५ शिक्षकीय पदे भरण्यात येतील.

समितीने, नागपूर विद्यापीठाकडून हस्तांतरित केलेले बिंदू नामावलीचे रेकॉर्ड सर्व संलग्नित महाविद्यालयांनी त्वरित अद्ययावत करून घ्यावे, असे गोंडवाना विद्यापीठाने कळविले आहे. त्यानुसार महाविद्यालयांचा अनुशेष सहायक आयुक्तांनी भरुन काढल्यानंतरच पदे भरण्याची जाहिरात देण्यात यावी असे सूचित केले असता सर्व महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे विद्यापीठाने कळविले आहे असे प्रधान सचिवांनी विदित केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

(१) समितीने गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संदर्भात दिनांक ७ जुलै २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी गडचिरोली येथे मॉडेल कॉलेज सुरू करण्याचे प्रस्तावित असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. ज्या जिल्ह्यांमध्ये उच्च शिक्षणाचे राष्ट्रीय प्रमाण कमी आहे, त्या जिल्ह्यांमध्ये मॉडेल कॉलेजेस सुरू केली जातात. म्हणून सदर मॉडेल कॉलेज गडचिरोली येथे होणे आवश्यक आहे. **सबब, मॉडेल कॉलेज सुरू होण्यासाठी लागणारी विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता व रजिस्ट्रेशन तसेच मॉडेल कॉलेज सुरू करण्यासाठी लागणारा निधी तसेच भूखंड मिळण्यासाठी लवकरात लवकर कार्यवाही करून धोरणात्मक निर्णय द्यावा व त्याबाबतची माहिती समितीस सहा महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

(२) साक्षीच्यावेळी गोंडवाना विद्यापीठात व गोंडवाना विद्यापीठांतर्गत येणा-या विविध महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची अनेक पदे रिक्त असल्याचे समितीस आढळून आले. यामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील शिक्षकांची ६७ पदे व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची १६ पदे रिक्त आहेत. **सबब, विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील ६७ शिक्षकांची रिक्त पदे व १६ शिक्षकेत्तर कर्मचा-यांची रिक्त असलेली पदे लवकरात लवकर भरण्यात यावीत व त्याबाबतची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**



# परिशिष्ट - एक

## गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे दिनांक २३ सप्टेंबर २०१३ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी समितीला प्राप्त झालेली माहिती

॥ ज्ञाना देव तु कैवल्यम् ॥

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक संकीर्ण २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

डॉ. विनायक इरपाते
कुलसचिव

कुलसचिवाचे कार्यालय :
एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५
Ph. (07132) 223104 / 222204, Fax : (07132) 223104 Cell : 9404528930, E-mail : v.irpate@rediffmail.com

जा.क्र. गो.वि./ 1543/13
स्मरण पत्र

दिनांक : 2.5.13

प्रति,

मा. प्रधान सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
विस्तार भवन मुंबई –३२

मार्फत :– मा. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, पुणे.

विषय :– विद्यापीठात सुरू असलेल्या ०५ पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची पद भरण्याकरिता मान्यता प्रदान करण्याबाबत.

संदर्भ :– विद्यापीठाचे पत्र क्र. गो.वि./३२२/२०१२, दि. १९/०३/२०१२ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये सादर करण्यात येते की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या गडचिरोली येथील पदव्युत्तर उपकेंद्रात इंग्रजी, इतिहास, समाजशास्त्र, गणित वाणिज्य हे ०५ पदव्युत्तर अभ्यासक्रम अनेक वर्षापासून होते. गोंडवाना विद्यापीठाच्या स्थापनेनंतर हे ०५ पदव्युत्तर अभ्यासक्रम गोंडवाना विद्यापीठाला हस्तांतरीत करण्यात आले असून ते या विद्यापीठात सुरू आहेत. आतापर्यंत या ०५ अभ्यासक्रमासाठी रिक्त शिक्षकांची पदे भरण्यासाठी शासनाची मान्यता मिळालेली नसल्यामुळे सदर अभ्यासक्रम अंशकालीन शिक्षकाव्दारे चालविण्यात येत आहेत. त्यामुळे प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापकांची पदे न भरल्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 12 (B) प्रमाणपत्राला हे विद्यापीठ मुकले असून अनेक शैक्षणिक मुलभूत सोयी सुविधा निर्माण करण्यास अडचणी येत आहेत.

सदर अभ्यासक्रमांसाठी ३५ शिक्षक व २६ शिक्षकेत्तर कर्मचारी यांची पदे निर्माण करण्यासाठी या विद्यापीठाद्वारे आपल्याकडे मंजूरीसाठी विस्तृत प्रस्ताव पाठविण्यात आलेला होता. परंतू अद्यापही ५ पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबत मंजूरी मिळालेली नाही.

करिता ०५ पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३५ शिक्षक व २६ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात यावी, ही विनंती.

धन्यवाद !

प्र/क कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली



महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
Web: www.dhepune.gov.in E-mail- dhepune@yahoo.co.in
फोन नंबर- ०२०/ २६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३१ फॅक्स नंबर- ०२०/२६१११११५३,

क्रमांक-युएन आय/२१८६/२०१२/गोंड.विद्या/नांव/विशि-१

दिनांक- ५ एप्रिल,२०१२

प्रति,

मा.प्रधान सचिव
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन,
मुंबई-४०० ०३२.

7 APR 2012

विषय-विद्यापीठात सुरु असलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची पदे भरण्याकरिता मान्यता प्रदान करण्याबाबत.

संदर्भ- कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांचे क्रमांक गो.वि/३२२/२०१२ दिनांक १९.०३.२०१२

उपरोक्त विषयाबाबतचे कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांचे संदर्भिय पत्र व सहपत्रे सोबत जोडली आहेत. कृपया अवलोकनी घ्यावीत

वरील संदर्भिय पत्रानुसार सादर करण्यात येते की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे विभाजन करुन गडचिरोली गोंडवाना विद्यापीठाची स्थापना करण्यात आलेली आहे. याठिकाणी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु होते.

या उपकेंद्रामध्ये सुरु असलेले ५ अभ्यासक्रम गोंडवाना विद्यापीठाला हस्तांतरीत झालेले आहेत आणि उपकेंद्र व ५ पदव्युत्तर अभ्यासक्रम गोंडवाना विद्यापीठाचे भाग असेल असे राजपत्रात नमूद केलेले आहे. तसेच गडचिरोली येथील उपकेंद्राची स्थावर व जंगम मालमत्ता ही गोंडवाना विद्यापीठाला हस्तांतरीत झाली आहे. त्यामुळे गोंडवाना विद्यापीठात १० एकर जागा व दोन मजली इमारत फर्निचरसह उपलब्ध आहे.

या ५ पदव्युत्तर शैक्षणिक विभागात शिक्षक व शिक्षकेत्तर पदांना मान्यता न घेण्यात आल्यामुळे सदर पदे भरण्यात आलेली नाहीत. यामध्ये इंग्रजी (कला शाखा) इतिहास व समाजशास्त्र(समाज विज्ञान शाखा) वाणिज्य (वाणिज्य शाखा) व गणित (विज्ञान शाखा) या ५ पदव्युत्तर विभागाच्या अभ्यासक्रमाचे प्रारुप

कार्यभार व लागणारा अपेक्षित खर्च इत्यादीची माहिती प्रस्तावात सादर केलेली आहे. सदर ५ विभागासाठी २६ शिक्षकीय पदे व २६ शिक्षकेत्तर पदांची आवश्यकता आहे. सदरचे अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी इमारत व शैक्षणिक सुविधांची व्यवस्था उपलब्ध आहे. सदरची पदांचा तपशील हा खालीलप्रमाणे आहे.

शिक्षकीय पदे

| अ.क्र. | पदांचे नांव | पदांची संख्या | वेतनश्रेणी | मासिक एकूण वेतन | एकूण वार्षिक वेतन |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ० | ० |
| १ | प्राध्यापक | ०६ | ३७४००-६७००० ग्रेड पे १०००० | ४९९९९२ | ५९९९९०४ |
| २ | सहयोगी प्राध्यापक | ०७ | ३७४००-६७००० ग्रेड पे ९००० | ५७१५६४ | ६८५८७६८ |
| ३ | सहाय्यक प्राध्यापक | १३ | १५६००-३७००० ग्रेड पे ८००० | ५५११८४ | ६६१४२०८ |
| | एकूण | | | १६,२२,७४० | १,९४,७२,८८० |

शिक्षकेत्तर पदे

| अ.क्र. | पदांचे नांव | पदांची संख्या | वेतनश्रेणी | मासिक एकूण वेतन | एकूण वार्षिक वेतन |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ० | ० |
| १ | अधीक्षक | ०१ | ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० | २४९१६ | २९८९९२ |
| २ | सिनिअर ग्रेड क्लर्क | ५ | ९३००-३४८०० ग्रेड पे- ४३०० | १२३७४० | १४८४८८० |
| ३ | युडीसी क्लर्क | ५ | ९३००-३४८०० ग्रेड पे २४०० | १०७७८० | १२९३३६० |
| ४ | एलडीसी क्लर्क | ५ | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | १०३५८० | १२४२९६० |
| ५ | शिपाई | ५ | ४४००-७४०० ग्रेड पे १६०० | ५९९०० | ७१८८०० |
| ६ | फरांस | ५ | ४४००-७४०० ग्रेड पे १३०० | ५७३८० | ६८८५६० |
| | एकूण | २६ | | ४७७२९६ | ५७,२७,५५२ |



वरील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर पदांची विद्यापीठास अत्यंत आवश्यकता आहे. तरी याबाबत शिक्षक संवर्गातील २६ पदे व शिक्षकेत्तर संवर्गातील २६ पदांना मान्यता देवून त्याचा आर्थिक भार शासनाने स्वीकारण्याबाबत शासनास शिफारस करण्यात येत आहे. तरी याबाबतचे शासन आदेश निर्गमित करण्यात यावेत अशी शासनास विनंती करण्यात येत आहे.

(डॉ.प्र.रा.गायकवाड)
प्र.शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत - कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस व कार्यवाहीसाठी

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली व विद्यापीठाच्या अंतर्ग महाविद्यालयातील सरळसेवा भरती पध्दतीने भरलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या प्रवर्गातील अधिकारी, तांत्रिक व अंतात्रिक पदावरील कर्मचाऱ्यांची जूलै २०१३ अखेरपर्यंतची सद्य:स्थिती, बिंदु नामावलीनुसार शिल्लक असलेल्या अनुशेषाची माहिती व रिक्त पदे दर्शविणारे विवरणपत्र **अतांत्रिक/तांत्रिक पदे**

| पदाचे नांव | वर्ष | वेतनश्रेणी | एकुण मंजुर पदे | भरलेली पदे ५ | | रिक्त पदे | विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी अ ब क ड यादीनुसार आरक्षित असलेल्या पदांची संख्या | विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी अ ब क ड यादीनुसार प्रत्यक्षात भरण्यात आलेल्या पदांची संख्या | अनुशेष | अभिप्राय/शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | सरळसेवा | पदोन्नती | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| उपकुलसचिव | २०१२-१३ | १५६००-३९१०० | ४ | २ | २* | - | - | - | - | |
| विद्यापीठ अभियंता | २०१२-१३ | १५६००-३९१०० | १ | १ | - | - | - | - | - | |
| सिस्टम ॲनालिस्ट | २०१२-१३ | १५६००-३९१०० | १ | १ | - | - | - | - | - | |
| सहाय्यक कुलसचिव | २०१२-१३ | ९३००-३४८०० | ५ | २ | ३* | - | - | - | - | |
| स्विय सहाय्यक | २०१२-१३ | ९३००-३४८०० | १ | - | - | १ | - | - | १ | |
| अधिक्षक | २०१२-१३ | ९३००-३४८०० | ७ | ३ | ४* | - | - | - | - | |
| असिस्टंट प्रोग्रामर | २०१२-१३ | ९३००-३४८०० | २ | २ | - | - | - | - | - | |
| वरिष्ठ लघुलेखक | २०१२-१३ | ९३००-३४८०० | ३ | ३ | - | - | - | - | - | |
| कनिष्ठ अभियंता (स्था.) | २०१२-१३ | ९३००-३४८०० | ३ | ३ | - | - | - | - | - | |
| कनिष्ठ अभियंता (वि.) | २०१२-१३ | ९३००-३४८०० | १ | १ | - | - | - | - | - | |
| कनिष्ठ लघुलेखक | २०१२-१३ | ९३००-३४८०० | ४ | ४ | - | - | - | - | - | |
| सांख्यिकी सहाय्यक | २०१२-१३ | ९३००-३४८०० | १ | १ | - | - | - | - | - | |
| निवडश्रेणी लिपीक | २०१२-१३ | ९३००-३४८०० | १२ | ६ | ४* | २* | १ | १ | २* | |
| उच्चश्रेणी लिपीक | २०१२-१३ | ५२००-२०२०० | २० | १० | ५* | ५* | १ | १ | ५* | |
| वरिष्ठ विजतंत्री | २०१२-१३ | ५२००-२०२०० | १ | १ | - | - | - | - | - | |
| कनिष्ठ विजतंत्री | २०१२-१३ | ५२००-२०२०० | १ | १ | - | - | - | - | - | |
| कनिष्ठ लिपीक | २०१२-१३ | ५२००-२०२०० | ३६ | २७ | ५* | ४* | २ | २ | ४* | |
| वाहन चालक | २०१२-१३ | ५२००-२०२०० | ६ | ६ | - | - | १ | १ | - | |
| शिपाई | २०१२-१३ | ४४४०-७४४० | २५ | १६ | - | ०९ | २ | २ | ९ | |
| चौकिदार | २०१२-१३ | ४४४०-७४४० | ८ | ८ | - | - | १ | १ | - | |
| फर्रास | २०१२-१३ | ४४४०-७४४० | ६ | २ | - | ४ | १ | - | ४ | १ पद वि. जा/भ. ज. बाकी |
| उद्यानरेजा | २०१२-१३ | ४४४०-७४४० | ७ | ४ | - | ३ | १ | - | ३ | १ पद वि. जा/भ. ज. बाकी |
| सफाईगार | २०१२-१३ | ४४४०-७४४० | २ | २ | - | - | - | - | - | |
| अभियांत्रिकी मजुर | २०१२-१३ | ४४४०-७४४० | ३ | ३ | - | - | - | - | - | |
| **एकुण** | | | १६० | १०९ | २३ | १७+११* | १० | ०८ | १७+११* | |

*सुचना :- एकुण मंजुर पदामध्ये पदोन्नतीची पदे समाविष्ठ करण्यात आलेली आहे. विद्यापीठ नवनिर्मीत असल्यामुळे पदोन्नतीची पदे ही प्रतिनियुक्तीच्या माध्यमाने भरण्यात आलेली आहेत.

विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील सरळसेवा भरती पध्दतीने भरलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या प्रवर्गातील अधिकारी, अधिव्याख्याते, तांत्रीक व अतांत्रीक पदावरील कर्मचाऱ्यांची जून २०१३ अखेर पर्यंतची सद्य:स्थिती, बिंदू नामावलीनुसार शिल्लक असलेल्या अनुशेषाची माहिती व रिक्त पदे दर्शविणारे विवरणपत्र

**अनुदानित महाविद्यालये**

| अ. क्र | महाविद्यालयाचे नांव | पदाचे नांवे | वर्षे | वेतनश्रेणी | एकुण मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी अ ब क ड यादीनुसार आरक्षीत असलेल्या पदांची संख्या | विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी अ ब क ड यादीनुसार प्रत्यक्षात भरण्यात आलेल्या पदांची संख्या | अनुशेष | अभिप्राय / शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९<br>अ ब क ड | १०<br>अ ब क ड | ११ | १२ |
| १ | महिला महाविद्यालय, गडचिरोली | प्राचार्य | | | १ | १ | — | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिव्याख्याता | | | १० | ८ | २ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिक्षक | | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | | | १ | निरंक | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ट लिपीक | | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | | | २ | २ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | | | ४ | ३ | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| २ | शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ३ | भगवंतराव कला महाविद्यालय, सिरोंचा | ग्रंथालय परिचर | १९९६/ | ११२३० | १ | १ | निरंक | भ.ज.(ब) | भ.ज.(ब) | निरंक | |
| | | | | | | | | | | | |
| ४ | श्री. जिवनराम सिताराम पाटील मुनघाटे कला, वाणिज्य महाविद्यालय, धानोरा | प्रयोगशाळा परिचर | | | ४ | ४ | निरंक | भ.ज.(ब) | भ.ज.(ब) | निरंक | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| ५ | श्री. सद्गुरू साईबाबा सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टी | प्राचार्य | २०१० | ३७४०० | १ | १ | — | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिव्याख्याता | २००९ | १५६०० | ११ | ४ | ७ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २००८ | ९३०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २००६ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २००५ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २००४ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा सहायक | २००२ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा परिचर | २००२/०५ | ५२०० | ४ | ४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | २००२/०५ | ४४४० | ४ | ४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |



| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | अनिकेत समाजकार्य महाविद्यालय, वडसा, जि. गडचिरोली | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ७ | डॉ. सि.वी. रमण विज्ञान महाविद्यालय, सिरोंचा | प्रयोगशाळा परिचर | | | ४ | ४ | निरंक | १ | १ | निरंक | |
| | | शिपाई | २००९/१० | ४४४० | ४ | ४ | निरंक | १ | १ | निरंक | |
| ८ | कर्मवीर दादासाहेब देवतळे महाविद्यालय, चामोर्शी | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ९ | शासकिय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली | वर्ग–१ | २०१२/१३ | ३७००० | १४ | १० | ४ | निरंक | भ.ज. क १ | निरंक | |
| | | वर्ग–३ | २०१२/१३ | ५२०० | ५ | ४ | १ | निरंक | | निरंक | |
| | | वर्ग–४ | २०१२/१३ | ५२०० | ७ | ७ | निरंक | निरंक | भ.ज. ब १ | निरंक | |
| १० | नेताजी सुभाषचंद्र विज्ञान महाविद्यालय, मुलचेरा | कनिष्ठ लिपीक | | | १ | १ | निरंक | वि.जा.अ | वि.जा.अ | निरंक | |
| ११ | वनश्री कला व विज्ञान महाविद्यालय कोरची, जि. गडचिरोली | | | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | | | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| १२ | श्री. शंकरराव बेझलवार कला व वाणिज्य महाविद्यालय, अहेरी | शिपाई | | | ४ | ४ | निरंक | वि.जा.अ / भ.ज. ब | वि.जा.अ / भ.ज. ब | निरंक | |
| १३ | फुले आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली | सहा. अधिव्याख्याता | | | १ | १ | निरंक | भ.ज. ब | भ.ज. ब | निरंक | |
| | | पहारेकरी | | | १ | १ | निरंक | भ.ज. ब | भ.ज. ब | निरंक | |
| १४ | महात्मा ज्योतिबा फुले कला महाविद्यालय, आष्टी | लिपीक | २०१३ | | ३ | ३ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | २०१३ | | ५ | ५ | निरंक | १ | १ | निरंक | |
| १५ | महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न.प. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली | प्राचार्य | २०१२/१३ | ४३००० | १ | १ | — | निरंक | निरंक | निरंक | |
| | | सह. प्राध्यापक | २०१२/१३ | ३७४०० | १० | १० | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | सहा. प्राध्यापक | २०१२/१३ | १५६०० | २९ | १८ | ११ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिक्षक | २०१२/१३ | ९३०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | ९३०० | १ | रिक्त | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ट लिपीक | २०१२/१३ | ५२०० | २ | २ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | ५२०० | २ | २ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा सहायक | २०१२/१३ | ५२०० | २ | २ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा परिचर | २०१२/१३ | ५२०० | ८ | ७ | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | ४४४० | ४ | ४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | मोहसिनभाई जव्हेरी वरिष्ठ महाविद्यालय, वडसा, जि. गडचिरोली | अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त असल्यामुळे आरक्षण लागू होत नाही | | | | | | | | | |
| १७ | आदर्श कला वाणिज्य महाविद्यालय, देसाईगंज (वडसा) | प्राचार्य | | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिव्याख्याता | | | १४ | १४ | निरंक | १ | १ | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | | ४ | ४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| १८ | राजे धर्मराव विज्ञान महाविद्यालय, अहेरी | प्राचार्य | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिव्याख्याता | २०१२/१३ | | १३ | ७ | ५ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा सहायक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा परिचर | २०१२/१३ | | ५ | ५ | निरंक | १ | १ | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | | ४ | ४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| १९ | राजे धर्मराव कला वाणिज्य महाविद्यालय, आलापल्ली | प्राचार्य | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिव्याख्याता | २०१२/१३ | | १२ | ९ | ३ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | २ | २ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | | ४ | ४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |



| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | राजे धर्मराव कला वाणिज्य महाविद्यालय, मुलचेरा | प्राचार्य | २०१२/१३ | | १ | रिक्त | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिव्याख्याता | २०१२/१३ | | ८ | ८ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | | ४ | ४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| २१ | गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय, कुरखेडा | प्राचार्य | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिव्याख्याता | २०१२/१३ | | २९ | १६ | १३ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | १ | रिक्त | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा सहायक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा परिचर | २०१२/१३ | | ४ | ४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | | ४ | ४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| २२ | राजे विश्वेश्वरराव कला वाणिज्य महाविद्यालय, भामरागड | प्राचार्य | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिव्याख्याता | २०१२/१३ | | ७ | ७ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | ३ | ३ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | | ४ | ४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| २३ | भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालय, एटापल्ली | प्राचार्य | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिव्याख्याता | २०१२/१३ | | १३ | ८ | ५ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा सहायक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा परिचर | २०१२/१३ | | २ | २ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | | ४ | ४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर | प्राचार्य | २०१२/१३ | ३७४०० | १ | १ | — | निरंक | निरंक | निरंक | |
| | | सह./सहा. प्राध्यापक | २०१२/१३ | १५६०० | ५५ | ४९ | ६ | ३ | ३ | निरंक | |
| | | प्रबंधक | २०१२/१३ | ९३०० | १ | रिक्त | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिक्षक | २०१२/१३ | ९३०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | ९३०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | लघुलेखक | २०१२/१३ | ९३०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | सहा. ग्रंथपाल | २०१२/१३ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | ५२०० | २ | १ | २ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | ५२०० | ७ | ७ | निरंक | १ | रिक्त | १ | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | ५२०० | ७ | १ | निरंक | १ | रिक्त | १ | |
| | | प्रयोगशाळा सहायक | २०१२/१३ | ५२०० | २ | २ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा परिचर | २०१२/१३ | ५२०० | ८ | ७ | १ | १ | रिक्त | १ | |
| | | शिपाई | २०१२/१३ | ४४४० | ९ | ८ | १ | १ | १ | निरंक | |
| २५ | जनता महाविद्यालय, चंद्रपूर | प्राचार्य | २०१२/१३ | ३७४०० | १ | १ | — | निरंक | निरंक | निरंक | |
| | | सह./सहा. प्राध्यापक | २०१२/१३ | १५६०० | ४९ | ३४ | १५ | १ | रिक्त | १ | ✓ |
| | | प्रबंधक | २०१२/१३ | ९३०० | १ | रिक्त | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिक्षक | २०१२/१३ | ९३०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | ९३०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | क. लघुलेखक | २०१२/१३ | ९३०० | १ | रिक्त | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | सहा. ग्रंथपाल | २०१२/१३ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | ५२०० | २ | २ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | ५२०० | ६ | ६ | निरंक | १ | रिक्त | १ | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | ५२०० | ७ | १ | निरंक | १ | रिक्त | १ | |
| | | प्रयोगशाळा सहायक | २०१२/१३ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा परिचर | २०१२/१३ | ५२०० | ३६ | ३५ | १ | ४ | ४ | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | ४४४० | १० | १० | निरंक | १ | १ | निरंक | |
| २६ | विवेकानंद महाविद्यालय, भद्रावती | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| २७ | कर्मवीर महाविद्यालय, मुल | प्राचार्य | २०१२/१३ | ३७४०० | १ | १ | — | निरंक | निरंक | निरंक | |
| | | सह./सहा. प्राध्यापक | २०१२/१३ | १५६०० | १२ | ४ | ८ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिक्षक | २०१२/१३ | ९३०० | १ | रिक्त | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | ९३०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | ५२०० | २ | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | ५२०० | २ | २ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | ५२०० | ४ | ३ | १ | निरंक | निरंक | निरंक | |



| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८ | यादवराव पोशट्टीवार कला महाविद्यालय, तळोधी (बाळापूर) | प्राचार्य | २००१ | ३७४०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | सह./सहा. प्राध्यापक | २००३/०९ | १५६०० | ९ | ९ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २००१ | ९३०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २००१ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २००१ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २००१ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | २००१ | ४४४० | ४ | ३ | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| २९ | नेवजाबाई हितकारीणी महाविद्यालय ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर | प्राचार्य | २०१२/१३ | ३७४०० | १ | १ | — | निरंक | निरंक | निरंक | |
| | | सह./सहा. प्राध्यापक | २०१२/१३ | १५६०० | ४४ | ३२ | १२ | ३ | रिक्त | ३ | ✓ |
| | | अधिक्षक | २०१२/१३ | ९३०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | ९३०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | ५२०० | २ | रिक्त | २ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | ५२०० | ४ | ४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा सहायक | २०१२/१३ | ५२०० | ३ | ३ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा परिचर | २०१२/१३ | ५२०० | १२ | १२ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | ५२०० | ४ | ५ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | ४४४० | ५ | ५ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ३० | कला, वाणिज्य महाविद्यालय गोंडपिपरी, जि. चंद्रपूर | प्राचार्य | १९९५ | ३७४०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | सह./सहा. प्राध्यापक | १९९१/९६ | १५६०० | १० | १० | निरंक | वि.जा.अ १ | वि.जा.अ १ | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | ९३०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | १९९०/९४ | ४४४० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ३१ | कला व वाणिज्य महाविद्यालय, भिसी, ता. चिमुर जि. चंद्रपूर | वर्ग — १ | | | ३ | रिक्त | ३ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वर्ग — २ | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वर्ग — ३ | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वर्ग — ४ | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ३२ | जनता शिक्षण महाविद्यालय, चंद्रपूर | अधिव्याख्याता | २०१२/१३ | १५६०० | ६ | २ | ४ | वि.जा.अ १ | निरंक | रिक्त | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| ३३ | आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर | वर्ग — १ | २०१२/१३ | १५६०० | ३५ | २७ | ९ | १ | १ | निरंक | |
| | | वर्ग—३/४ | २०१२/१३ | | ५४ | ४३ | ९ | ४ | २ | २ | |
| | | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३४ | कला महाविद्यालय, कोरपना जि. चंद्रपूर | प्राचार्य | २००९ | ३७४०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | सह./सहा. प्राध्यापक | २००० | १५६०० | ७ | ७ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | १९९७ | ९३०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | १९९७ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | १९९४ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | १९९७ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | १९९४ | ४४४० | ४ | ४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | | | | | | | | | | |
| ३५ | सर्वोदय महाविद्यालय, सिंदेवाही | | | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | | | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ३६ | चिंतामणी कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, गोंडपिपरी | प्राचार्य | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | सह./सहा. प्राध्यापक | २०१२/१३ | | १६ | ४ | १२ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | ३ | २ | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा सहायक | २०१२/१३ | | ३ | १ | २ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा परिचर | २०१२/१३ | | ४ | ४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | | १ | २ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | | ४ | ४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | | | | | | | | | | |
| ३७ | लोकमान्य महाविद्यालय, वरोरा जि. चंद्रपूर | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ३८ | शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय, चंद्रपूर | अधिव्याख्याता | | | १ | निरंक | १ | १ | रिक्त | १ | ✓ |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| ३९ | गुरूकुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदा | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| | | | | | | | | | | | |
| ४० | राष्ट्रपीता महात्मा गांधी कला व वाणिज्य महाविद्यालय, सावली | प्राचार्य | | ३७४०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | सह./सहा. प्राध्यापक | | १५६०० | ७ | ७ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | | ९३०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | | ४४४० | ४ | ४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | | | | | | | | | | |



| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४१ | निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालय, भद्रावती | प्राचार्य | २०१२/१३ | ३७४०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | सह./सहा. प्राध्यापक | २०१२/१३ | १५६०० | १५ | १० | ५ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | ५२०० | १ | १ | निरंक | | | | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | ५२०० | १ | १ | निरंक | | | | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा सहायक | २०१२/१३ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा परिचर | २०१२/१३ | ५२०० | २ | २ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | ४४४० | ४ | ४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ४२ | महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय बल्लारपूर, जि. चंद्रपूर | प्राचार्य | | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | सह./सहा. प्राध्यापक | | | १७ | १३ | ४ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिक्षक | | | १ | १ | निरंक | | | | |
| | | मुख्य लिपीक | | | १ | निरंक | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | | | २ | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | | | ० | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | | | ४ | ३ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ४३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर<br>सन २०१२–१३ पासुन महाराष्ट्र शासनाने संस्थेला अल्पसंख्यांक दर्जा दिलेला आहे | प्राचार्य | २०१२/१३ | ३७४०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | सह./सहा. प्राध्यापक | २०१२/१३ | १५६०० | १२ | ११ | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिक्षक | २०१२/१३ | ९३०० | १ | निरंक | १ | | | | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | ९३०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | ५२०० | २ | १ | २ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | ५२०० | ४ | ३ | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | ५२०० | ३ | १ | २ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | ४४४० | ४ | ३ | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| ४४ | राष्ट्रपीता महात्मा गांधी कला व विज्ञान महाविद्यालय, नागभिड | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ४५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय, चिमुर, जि. चंद्रपूर | प्राचार्य | २०१२/१३ | ३७४०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | सह./सहा. प्राध्यापक | २०१२/१३ | १५६०० | १३ | ८ | ५ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिक्षक | २०१२/१३ | ९३०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | ९३०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | ५२०० | २ | २ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | ५२०० | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | ४४४० | ४ | ३ | १ | भ.ज.ब १ | भ.ज.ब १ | निरंक | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४६ | डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स, चंद्रपूर | अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त महाविद्यालय | | | | | | | | | |
| ४७ | श्री ज्ञानेश महाविद्यालय, नवरगांव, जि. चंद्रपूर | प्राचार्य | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिव्याख्याता | २०१२/१३ | | १७ | १५ | २ | १ | १ | निरंक | |
| | | अधिक्षक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | २ | २ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | | ७ | ४ | ३ | १ | रिक्त | १ | |
| | | प्रयोगशाळा सहायक | २०१२/१३ | | २ | रिक्त | २ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा परिचर | २०१२/१३ | | २ | २ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | | ४ | ४ | निरंक | १ | रिक्त | १ | |
| ४८ | एफ.ई.एस. गर्लस् कॉलेज, चंद्रपूर | प्राचार्य | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिव्याख्याता | २०१२/१३ | | २५ | २२ | ३ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिक्षक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | २ | २ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | | २ | २ | निरंक | निरंक | रिक्त | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | | ४ | ४ | निरंक | निरंक | रिक्त | निरंक | |
| ४९ | चिंतामणी महाविद्यालय, पोंभुर्णा, जि. चंद्रपूर | प्राचार्य | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिव्याख्याता | २०१२/१३ | | ९ | ८ | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | रिक्त | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | | ४ | ४ | निरंक | निरंक | रिक्त | निरंक | |



| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५० | चिंतामणी विज्ञान महाविद्यालय, पोंभुर्णा, जि. चंद्रपूर | प्राचार्य | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | अधिव्याख्याता | २०१२/१३ | | १५ | ४ | ११ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | मुख्य लिपीक | २०१२/१३ | | १ | रिक्त | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | वरिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | कनिष्ठ लिपीक | २०१२/१३ | | २ | २ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा सहायक | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | प्रयोगशाळा परिचर | २०१२/१३ | | ४ | ३ | १ | निरंक | निरंक | निरंक | |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | | १ | १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | शिपाई | २०१२/१३ | | ४ | ४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ५१ | आठवले समाजकार्य महाविद्यालय, चिमूर, जि. चंद्रपूर | शिपाई | २०१२/१३ | | २ | २ | निरंक | १ | १ | निरंक | |
| ५२ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तुकूम, जि. चंद्रपूर | | | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ५३ | शरद पवार कला व वाणिज्य महाविद्यालय, गडचांदूर | | | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ५४ | स्व. सुशिलाबाई रामचंद्र मामिडवार कॉलेज ऑफ सोशल वर्क, पडोली, चंद्रपूर | अधिव्याख्याता | २०१२/१३ | | २० | १६ | ४ | २ | १ | १ | ✓ |
| ५५ | गोविंदराव वारजुरकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नागभिड | | | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ५६ | गुरुनानक विज्ञान महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर | अधिव्याख्याता | २०१२/१३ | | २८ | १९ | ९ | १ | १ | निरंक | |
| | | प्रयोगशाळा सहायक | २०१२/१३ | | ६ | ३ | ३ | १ | रिक्त | १ | |
| | | प्रयोगशाळा परिचर | २०१२/१३ | | २२ | २६ | निरंक | २ | रिक्त | २ | |
| ५७ | श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजुरा | अधिव्याख्याता | २०१२/१३ | | ३२ | २२ | १० | २ | रिक्त | २ | ✓ |
| | | ग्रंथालय परिचर | २०१२/१३ | | ५ | ५ | निरंक | १ | रिक्त | १ | |
| | | प्रयोगशाळा परिचर | २०१२/१३ | | १० | ९ | १ | १ | रिक्त | १ | |
| ५८ | ज्ञानगीता कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चिमुर | | | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ५९ | गोविंदप्रभु कला व वाणिज्य महाविद्यालय, तळोधी (बा) | | | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ६० | कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, बल्लारपूर | | | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ६१ | श्री चिंतामणी कला व वाणिज्य महाविद्यालय, घुग्घुस, जि. चंद्रपूर | | | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |

अशासकिय अनुदानीत महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वि.जा./भ.ज. प्रवर्गातील अनुशेष

शिक्षक कर्मचारी – ८ पदे

शिक्षकेतर कर्मचारी – १४ पदे

## परिशिष्ट - दोन

## दिनांक ७ जुलै २०१५ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचेकडून समितीला पुरविण्यात आलेली माहिती.





गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठातील ५ पदव्युत्तर विभागाकरिता शिक्षकीय व शिक्षकेतर पदे मंजूर करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :संकिर्ण २०१२ /(२८९/१२) /विशि-१,**
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई-४०००३२,
दिनांक :- ५ डिसेंबर, २०१३

वाचा —

१) गोंडवाना विद्यापीठाचे क्र. गोवि / २५०/२०१२, दिनांक १३.७.१२ चे पत्र

प्रस्तावना —

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठाची स्थापना दिनांक १ डिसेंबर, २०११ च्या आदेशान्वये करण्यात आली असून, सदर विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी या विद्यापीठामध्ये इंग्रजी, इतिहास, समाजशास्त्र, वाणिज्य व गणित हे ५ विभाग सुरु करण्यासाठी आवश्यक ती शिक्षक व शिक्षकेतर पदे मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय—**

२. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथील इंग्रजी, इतिहास, समाजशास्त्र, वाणिज्य व गणित या ५ विभागासाठी खालीलप्रमाणे शिक्षक व शिक्षकेतर पदे नव्याने निर्माण करण्यास उच्च स्तरीय सचिव समितीने दिनांक १० ऑक्टोबर, २०१३ च्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली आहे.

(अ) शिक्षकीय पदे

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | अ.ग्रे.पे. | उच्चस्तरीय समितीने मंजूर केलेल्या पदांचा तपशिल | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पहिला टप्पा (सन २०१२-१३) | दुसरा टप्पा (सन २०१३-१४) | एकूण |
| १ | प्राध्यापक | ३७४००-६७००० | १०,००० | ५ | - | ५ |
| २ | सहयोगी प्राध्यापक | ३७४००-६७००० | ९,००० | - | १० | १० |
| ३ | सहायक प्राध्यापक | १५,६००-३९१०० | ६,००० | १० | १० | २० |
| एकूण | | | | १५ | २० | ३५ |

(ब) शिक्षकेतर पदे

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | ग्रे.पे. | उच्चस्तरीय समितीने मंजूर केलेल्या पदांचा तपशिल | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पहिला टप्पा (सन २०१२-१३) | दुसरा टप्पा (सन २०१३-१४) | एकूण |
| १ | अधिक्षक | ९३००-३४८०० | ४४०० | १ | - | १ |
| २ | कनिष्ठ लिपिक | ५२००-२०२०० | १९०० | ३ | - | ३ |
| एकूण | | | | ४ | - | ४ |
| एकूण - (अ) + (ब) = ३९ | | | | | | |

३. वरील पदांपैकी प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदांच्या निर्मितीसाठी मंत्रिमंडळाची मान्यतेची आवश्यकता आहे. त्यामुळे सदर पदे निर्माण करण्याचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

४. सबब, याव्दारे गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठातील उक्त ५ विभागांसाठी खालीलप्रमाणे शिक्षकीय व शिक्षकेतर पदे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

पहिला टप्पा (सन २०१२-१३)

(शिक्षकीय पदे)

| अ.क्र. | विभागाचे नांव | पदनाम | वेतनश्रेणी | ॲ. ग्रे. पे. | मंजूर पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | सहायक प्राध्यापक | १५६००-३९१०० | ६००० | २ |
| २ | इतिहास | सहायक प्राध्यापक | १५६००-३९१०० | ६००० | २ |
| ३ | समाजशास्त्र | सहायक प्राध्यापक | १५६००-३९१०० | ६००० | २ |
| ४ | वाणिज्य | सहायक प्राध्यापक | १५६००-३९१०० | ६००० | २ |
| ५ | गणित | सहायक प्राध्यापक | १५६००-३९१०० | ६००० | २ |
| एकूण | | | | | १० |

पहिला टप्पा (सन २०१२-१३) ( शिक्षकेतर पदे )

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | ग्रे. पे. | मंजूर पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | अधिक्षक | ९३००-३४८०० | ४४०० | १ |
| २ | कनिष्ठ लिपिक | ५२००-२०२०० | १९०० | ३ |
| एकूण | | | | ४ |

दुसरा टप्पा (सन २०१३-१४) ( शिक्षकीय पदे )

| अ.क्र. | विभागाचे नांव | पदनाम | वेतनश्रेणी | ॲ. ग्रे. पे. | मंजूर पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | सहायक प्राध्यापक | १५६००-३९१०० | ६००० | २ |
| २ | इतिहास | सहायक प्राध्यापक | १५६००-३९१०० | ६००० | २ |
| ३ | समाजशास्त्र | सहायक प्राध्यापक | १५६००-३९१०० | ६००० | २ |
| ४ | वाणिज्य | सहायक प्राध्यापक | १५६००-३९१०० | ६००० | २ |
| ५ | गणित | सहायक प्राध्यापक | १५६००-३९१०० | ६००० | २ |
| एकूण | | | | | १० |

५. वर नमूद २४ पदांसाठी येणा-या रु. १,३०,३५,०००/- (रुपये एक कोटी, तीस लक्ष, पस्तीस हजार, फक्त) एवढया आवर्ती खर्चास शासन मंजूरी देत आहे. सदर पदांच्या खर्चा संदर्भात पुरक मागणीचा





प्रस्ताव विहीत वेळेत सादर करण्याची जबाबदारी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांची राहील. सदर पदे शासनाने/विद्यापीठाने विहीत केलेल्या नियमानुसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरण्यात यावीत. तसेच यासाठी विहीत पध्दतीने निधी उपलब्ध करुन घेऊन खर्च करण्यात यावा.

६. यासाठी होणारा खर्च, “२२०२-सर्वसाधारण शिक्षण-०३-विद्यापीठीय व उच्च शिक्षण-१०२-विद्यापीठांना सहाय्य, (००)(०१) सर्वसाधारण शिक्षणासाठी विद्यापीठांना अनुदाने, ३५-सहायक अनुदान (२२०२ ०६८३)- मागणी क्र. डब्लू -२ ” या लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. संदर्भ/२४/व्यय-५/दिनांक १६.१.२०१३ व ११५/विसु-१, दिनांक २.४.२०१३ अन्वये त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१३१२०५१५२३४१६८०८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Vikas Thulshiram Kadam

Digitally signed by Vikas Thulshiram Kadam
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Higher & Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vikas Thulshiram Kadam
Date: 2013.12.05 17:24:35 +05'30'

(विकास तु. कदम)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई
२. मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
५. विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण , नागपूर विभाग, नागपूर
६. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
७. जिल्हा कोषाधिकारी, गडचिरोली /नागपूर/पुणे
८. वित्त विभाग, व्यय-५/ विसु-१, मंत्रालय, मुंबई
९. निवड नस्ती.(विशि-१)

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या
अकृषि विद्यापीठासाठी सांविधानिक
(Statutory) पदे मंजूर करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन,**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१०/(४२५/१०)-विशि-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ मार्च, २०११.

**प्रस्तावना :-**

चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांसाठी स्वतंत्ररित्या गोंडवाना विद्यापीठ स्थापन करण्यास मंत्रिमंडळाने दि.२६-५-२०१० च्या बैठकीत मंजूरी दिलेली आहे. त्यामध्ये गोंडवाना विद्यापीठाच्या स्थापनेसह इतर अनुषंगिक बाबी त्याचप्रमाणे सदर विद्यापीठासाठी आवश्यक असलेली सर्व सांविधानिक पदे मंजुर करण्याचा समावेश आहे.

२. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम १० मधील तरतूदीनुसार विद्यापीठासाठी प्रामुख्याने कुलगुरु, कुलसचिव, परिक्षा नियंत्रक, संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, ग्रंथपाल, वित्त व लेखा अधिकारी. या सहा सांविधानिक (Statutory) पदांची आवश्यकता आहे. सदर विद्यापीठासाठी उक्त सांविधानिक पदे मंजूर करण्यास उच्चस्तरीय सचिव समितीने दिनांक २१ जानेवारी, २०११ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यामुळे सदर गोंडवाना विद्यापीठासाठी उक्त सांविधानिक पदे मंजूर करणे व त्याअनुषंगाने येणाऱ्या खर्चास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन निर्णय

३. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठासाठी पुढीलप्रमाणे सांविधानिक पदे मंजूर करण्यात येत आहेत :-

(१) कुलगुरु,
(२) कुलसचिव,
(३) परिक्षा नियंत्रक
(४) संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
(५) ग्रंथपाल,
(६) वित्त व लेखा अधिकारी.

४. उक्त पदांच्या वेतनश्रेण्या व अनुषंगिक भत्ते, लाभ इत्यादी बाबी शासन निर्णय क्रमांक एनजीसी २००९/(२४३/०९)-विशि-१,दिनांक १२ ऑगस्ट, २००९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे लागू राहतील.



५. याबाबतचा खर्च "मागणी क्र.डब्ल्यू-२, २२०२, सर्व साधारण शिक्षण, ०३, विद्यापीठीय व उच्च शिक्षण, १०२ विद्यापीठांना सहाय्य, (००)(२२) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली ची स्थापना, ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनत्तर), ३५ सहाय्यक अनुदाने (वेतन)" या लेखाशीर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४१२//वित्तीय सुधारणा-१, दि.१७/०९/२०१० अन्वये त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २०११०३०५१८२३४२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरी/-
(विकास तु. कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली,
३) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर,
५) महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर,
६) कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली,
७) विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर.
८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
९) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर,
१०) सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२) आदिवासी विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४)निवड नस्ती.

दि.६ जुलै, २००९ च्या शासन निर्णयान्वये
अकृषि विद्यापीठातील शिक्षकेतर पदांच्या
निश्चित करण्यात आलेल्या आकृतीबंधानुसार
पदनिहाय मंजूरी देणे बाबत............
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.जीयुजी २०११/(१०४/११)/विशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२. दिनांक :- १६ मे, २०११.

<u>वाचा</u> : (१) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.असक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा.दि.१०.९.२००१.
(२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.असक-१००१/प्र.क्र.२९(भाग-६)/२००४/वित्तीय सुधारणा, दिनांक १.७.२००४.
(३) शासन निर्णय क्र.संकीर्ण २००७/(१२२/०७)/विशि-प्रशा, दिनांक ६ जुलै, २००९.
(४) शासन निर्णय क्र.जीयुपी २०१०/(६२२/१०)-विशि-१, दिनांक १० डिसेंबर, २०१०.
(५) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे क्र.रातुमनावि/कुस/आस्था/झो/११/२१७७, दि.२२-२-२०११ चे पत्र.
(६) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे क्र.रातुमनावि/कुस/आस्था/झो/११/२१७७, दि.०७-०५-२०११ चे पत्र.

<u>प्रस्तावना</u> :- वित्त विभागाने संदर्भाधीन क्र.१ येथील दि.१०.९.२००१ च्या शासन निर्णयान्वये पदांचा आढावा घेऊन आकृतिबंध निश्चित करावे व आकृतिबंध अंतिम झाल्याशिवाय रिक्त पदे भरु नयेत असे सर्व प्रशासकीय विभागाना आदेशित केले. वित्त विभागाच्या वरील निर्णयानुसार राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठाच्या शिक्षकीय व शिक्षकेतर पदांचा आढावा घेऊन आकृतिबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर प्रक्रियेला लागणारा विलंब लक्षात घेता शासनाने संदर्भाधीन क्र.२ येथील दिनांक १ जुलै, २००४ च्या शासन निर्णयान्वये मागासवर्गीय प्रवर्गाची ९०% व खुल्या प्रवर्गाची ५०% रिक्त पदे भरण्याची मुभा दिली. अशी सूट देऊनही अपुऱ्या मनुष्यबळामुळे विद्यापीठाच्या कामावर विपरीत परिणाम होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. वित्त विभागाच्या दि.१०.९.२००१ च्या निर्णयामुळे एका बाजुला सन २००१ रोजी अस्तित्वात असलेली रिक्त पदे भरता आली नाहीत, तर दुसऱ्या बाजुला सन २००१ नंतर वाढलेल्या कामासाठी आवश्यक पदांच्या बाबतीत सुध्दा निर्णय घेता आला नाही. दरम्यानच्या काळामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने याचिका क्र.८०६७/२००६ मध्ये दि.०६-०४-२००९ रोजी व नागपूर खंडपीठ यांनी सुमोटो याचिका क्र.२२१६/२००६ मध्ये दि.३-१२-२००८ रोजी राज्यातील शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक ती पावले उचलावीत व विद्यापीठाचा आकृतिबंध त्वरीत निश्चित करावा असे आदेशित केले. विद्यापीठातील अपुऱ्या मनुष्यबळामुळे शिक्षणावर होणारा संभाव्य दुष्परिणाम व मा.उच्च न्यायालयाचे वरील आदेश विचारात घेता, **संदर्भाधीन क्र.३ येथील दिनांक ६-७-२००९ च्या शासन निर्णयान्वये ९ अकृषि विद्यापीठांच्या शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे.**



२. सदर दि.६-७-२००९ च्या शासन निर्णयान्वये विद्यापीठांसाठी गटनिहाय पदे मंजूर करण्यात आली असून त्यामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठासाठी एकूण ९४४ पदे मंजूर करण्यात आली होती. सदर ९४४ पदांची वर्गवारी गट-अ-६६, गट-ब-५६, गट-क-५२० आणि गट-ड-३०२ अशी आहे. तथापि, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठच्या कार्यकक्षेतील गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यांसाठी स्वतंत्ररित्या गोंडवाना विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्यामुळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील कांही पदे गोंडवाना विद्यापीठाकडे वर्ग करणे आवश्यक होते. त्यानुसार गडचिरोली व चंद्रपूर जिल्हा वगळता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कार्यकक्षतील इतर जिल्ह्यातील विद्यार्थी संख्या विचारात घेऊन शासन निर्णय क्र.जीयुजी २०१०/(६२२/१०)-विशि-१, दिनांक १०-१२-२०१० अन्वये सुधारीत आकृतीबंध मंजूर करण्यात आला. त्यामध्ये गोंडवाना विद्यापीठासाठी एकूण १६० पदे मंजूर करण्यात आली आहेत. सदर १६० पदांची वर्गवारी गट-अ - ११, गट-ब - १०, गट क-८८ आणि गट ड-५१ अशी आहे.

२.१ संदर्भाधीन क्र.४ येथील शासन निर्णयामधील परिच्छेद १४ मध्ये सदर विद्यापीठाने पदनिहाय सविस्तर प्रस्ताव सादर करावा असे सूचित करण्यात आले. त्यानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने संदर्भ क्र.५ येथील दिनांक २२ फेब्रुवारी, २०११ व संदर्भ क्र.६ येथील दि.७ मे, २०११ च्या पत्रान्वये सविस्तर पदनिहाय प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुसार सदर विद्यापीठाच्या शिक्षकेतर पदांच्या पदनिहाय आकृतीबंधासंदर्भात खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय</u>

३. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठासाठी संदर्भाधीन क्र.४ येथील दिनांक १०-१२-२०१० च्या शासन निर्णयान्वये एकूण १६० शिक्षकेतर पदांच्या आकृतीबंधास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. **त्याचा पदनिहाय तपशील सोबतच्या प्रपत्र "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे मान्य करण्यात येत आहे.**

४. तसेच सोबतच्या **प्रपत्र "ब "** मधील पदे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडून गोंडवाना विद्यापीठाकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्रातील रिक्त पदे संदर्भाधीन क्र.३ येथील दि.६-७-२००९ व संदर्भाधीन क्र.४ येथील १०-१२-२०१० च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून भरण्यात यावीत.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. २७०/०९ विसु-१ दि. २/५/२००९ अन्वये आणि उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

७.   हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २०११०५१६१४०३१३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरी/-
(विकास तु. कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर,
३) कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली,
४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर,
६) महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, नागपूर,
७) विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर.
८) कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर,
९) कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली,
१०) जिल्हा कोषाधिकारी, पुणे,
११) जिल्हा कोषाधिकारी, नागपूर,
१२) जिल्हा कोषाधिकारी, गडचिरोली,
१३) वित्त विभाग
१४) निवड नस्ती.



# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी –४ महाराष्ट्र अधिनियम, १९९४(१९९४चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

विशेष मागासवर्ग कक्ष
एम. आय. डि. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली–४४२६०५ फोन. नं. ०७१३२–२१६५९६

जावक क्रमांक:गों.वि./वि.मा.क./६५/२०१५ — दि. १६/०६/२०१५

## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :- महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेत्तर पदांचे बिंदु नामावली अद्यावत करून अनुशेषाची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ, नागपुर येथे दिनांक १५/०६/२०१५ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई येथील मा. श्री. खरात, उपसचिव, (विशि) व मा. श्री. जाधव, अवर सचिव (विशि १) यांच्या सोबत दोन्ही विद्यापीठाच्या संयुक्त बैठकित झालेल्या निर्णयानुसार चंद्रपुर व गडचिरोली जिल्ह्यातील गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयामधील बिंदुनामावली संबंधीत मुळ दस्ताऐवज नागपुर विद्यापीठाकडुन गोंडवाना विद्यापीठाकडे दिनांक १६/०६/२०१५ रोजी हस्तांतरीत झालेले आहेत. तरी सर्व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, आपले महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांची बिंदुनामावली गोंडवाना विद्यापीठ मागासवर्ग कक्षाकडुन दिनांक ३१/०५/२०१५ पर्यंतची स्थिती अद्यावत करून अनुशेषाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही घेण्यात यावी.

आपला

कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी –४ महाराष्ट्र अधिनियम, १९९४(१९९४च्या महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

विशेष मागासवर्ग कक्ष

एम. आय. डि. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली–४४२६०५

जावक क्रमांक:गों.वि./वि.मा.क/१६/२०१२ दि. १८/०९/२०१२

प्रति,

सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

विषय :–कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विषयवार आणि संवर्गनिहाय बिंदु नामावल्या तयार करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर संवर्गातील रिक्त पदांना आरक्षण निर्धारण व महाविद्यालयातील कार्यरत असलेल्या शिक्षक आणि शिक्षकेत्तर संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बिंदु नामावल्या विशेष मागासवर्ग कक्षाकडून अद्यावत करुन प्रमाणित घेणे प्रत्येक महाविद्यालयास आरक्षण कायदा २००४ नुसार क्रमप्राप्त आहे.

आरक्षण कायदा २००४ नुसार बिंदु नामावली तयार करुन प्राथमिक तपासणी करीता विद्यापीठ विशेष मागास कक्षास सादर करण्याची जबाबदारी संबधीत संस्था/नियुक्ती प्राधिकारी यांची आहे.

यास्तव आपणास विनंती करण्यात येते की, सदर प्रस्ताव पाठवित असताना शासन निर्णय/परिपत्रक याचे अभ्यासपूर्ण वाचन करुन त्यातील नमुद तरतुदी व मार्गदर्शक तत्वानुसारच प्रस्ताव कार्यालयास सादर करावा, जेणे करुन कमी वेळात जास्तीत जास्त काम करणे प्रशासनास सोईचे होईल.

धन्यवाद.

आपला
( डॉ. विनायक इरपाते)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली



# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी –४ महाराष्ट्र अधिनियम, १९९४(१९९४च्या महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

विशेष मागासवर्ग कक्ष

एम. आय. डि. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली–४४२६०५ फोन. नं. ०७१३२–२१६५९६

जावक क्रमांक:गों.वि./वि.मा.क./१४१/२०१३ दि. ११/०९/२०१३

प्रति,

१) सर्व संलग्नित महाविद्यालयाच्या संस्थेचे अध्यक्ष/सचिव
२) सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य

विषय:– नियुक्ती अधिकाऱ्यांनी शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या संवर्गनिहाय बिंदुनामावल्या सादर करण्याबाबत.

संदर्भ:– १) या कार्यालयाचे पत्र क्र. गों.वि./विमाक/१६/२०१२, दिनांक १८/०९/२०१२
२) या कार्यालयाचे पत्र क्र. गों.वि./विमाक/२४/२०१२, दिनांक २९/१०/२०१२

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर पदांच्या संवर्गनिहाय बिंदूनामावल्या तयार करण्याविषयी आपणास कळविण्यात आले होते. परंतु अद्यापही बऱ्याच अनुदानित, कायम विना अनुदानित आणि विना अनुदानित महाविद्यालयांनी शिक्षक आणि शिक्षकेत्तर पदांच्या संवर्गनिहाय बिंदू नामावल्या तयार करून तपासणी आणि प्रमाणित करून घेण्यासाठी विभागास सादर करण्यात आलेली नाही. या विषयी विद्यापीठाच्या मागासवर्गीय कक्षाकडून उपरोक्त संदर्भाकीत पत्रान्वये वारंवार कळविण्यात आले होते. परंतु अद्यापही बऱ्याच महाविद्यालयांनी शिक्षक आणि शिक्षकेत्तर पदांच्या संवर्गनिहाय बिंदूनामावल्या तयार करून प्रमाणित करून घेतलेल्या नाहीत. यावरून असे स्पष्ट होते की, आपणास वारंवार पत्राव्दारे कळवून व ताकीद देऊनही आपण विद्यापीठाच्या निर्देशांचे अनुपालन केलेले नाही. ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे.

तसेच महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ७ (२) नुसार राज्य शासनाच्या आरक्षण धोरणाची व यासंबधी शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे अनुपालन करणे आपणास बंधनकारक आहे. राज्य शासनाच्या निर्देशानुसार मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्यासाठी मागासवर्गीय अनुशेष निर्धारीत करणे आवश्यक असून यासाठी संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या संवर्गनिहाय बिंदूनामावली तयार करणे गरजेचे आहे. परंतु अद्यापही आपल्या महाविद्यालयाद्वारे दिनांक ०५/११/२००९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या बिंदूनामावली तयार करून त्याची प्राथमिक तपासणी विद्यापीठाच्या मागासवर्गीय कक्षाद्वारे करण्यात येऊन, त्यास अंतीम मान्यता मा.सहायक आयुक्त, मागासवर्ग विशेष कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयाकडून न घेणे ही बाब राज्य शासनाच्या निर्देशांची व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ७(२) मध्ये नमुद तरतुदीचा भंग करणारी आहे.

तसेच आपल्या निदर्शनास असे आणून देण्यात येते की, उपरोक्त शासन परिपत्रकात संलग्नित अनुदानीत महाविद्यालये जो पर्यंत बिंदुनामावली सहायक आयुक्त (मावक) यांच्याकडून प्रमाणीत करून घेत नाही, तोपर्यंत अशा संस्थाचे पुढील अनुदान रोखण्यात यावे, असे नमुद केलेले आहे. त्यानुसार अनुदानीत महाविद्यालयासंदर्भात मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयाकडे कार्यवाहीसाठी प्रस्तावीत करता येईल.

तेव्हा दिनांक ५ नोव्हेंबर,२००९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये विद्यापीठाशी संलग्नित सर्व अनुदानित, विना अनुदानित आणि कायम विना अनुदानित महाविद्यालये त्यांच्या येथील कार्यरत शिक्षक आणि शिक्षकेत्तर पदांच्या विषयावर आणि संवर्गवार बिंदूनामावल्या या पत्रावरील दिनाकापासुन १० दिवसाच्या आत उपकुलसचिव, मागासवर्ग विशेष कक्ष, यांचेकडे सादर करावी. जो संलग्नित महाविद्यालये शिक्षक आणि शिक्षकेत्तर पदांच्या बिंदूनामावल्या तयार करून दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ रोजीच्या शासन परिपत्रकातील पान क्रमांक ८ वरील प्रपत्र–अ नमुद नुसार कार्यवाही देणार नाहीत अश्या महाविद्यालयांवर आरक्षण कायदा २००४ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कार्यवाही शासनाकडे प्रस्तावीत करण्यात येईल व याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाच्या संस्था चालकांची आणि महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील. कृपया याची नोंद घेण्यात यावी.

ही सुचना ज्या महाविद्यालयांनी बिंदू नामावल्यांची तपासणी केली असेल त्यांचे करीता लागू नाही.

धन्यवाद!

(डॉ. विनायक इरपाते)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी माहितीस्तव सादर:

१)मा सहायक आयुक्त, (मा.व.कक्ष) विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर
२)मा सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी –४ महाराष्ट्र अधिनियम, १९९४(१९९४चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

विशेष मागासवर्ग कक्ष

एम. आय. डि. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली–४४२६०५ फोन. नं. ०७१३२–२१६५९६

जावक क्रमांक:गों.वि./वि.मा.क./ /२०१४ दि. ०१/०४/२०१४

प्रति,

१) सर्व संलग्नित महाविद्यालयाच्या संस्थेचे अध्यक्ष/सचिव
२) सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य

विषयः– नियुक्ती अधिकाऱ्यांनी शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या संवर्गनिहाय बिंदूनामावल्या सादर करण्याबाबत.
संदर्भः– १) या कार्यालयाचे पत्र क्र. गों.वि./विमाक/१६/२०१२, दिनांक १८/०९/२०१२
२) या कार्यालयाचे पत्र क्र. गों.वि./विमाक/२४/२०१२, दिनांक २९/१०/२०१२

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर पदांच्या संवर्गनिहाय बिंदूनामावल्या तयार करण्याविषयी आपणास कळविण्यात आले होते. परंतु अद्यापही बऱ्याच अनुदानित, कायम विना अनुदानित आणि विना अनुदानित महाविद्यालयांनी शिक्षक आणि शिक्षकेत्तर पदांच्या संवर्गनिहाय बिंदू नामावल्या तयार करून तपासणी आणि प्रमाणित करून घेण्यासाठी विभागास सादर करण्यात आलेली नाही. या विषयी विद्यापीठाच्या मागासवर्गीय कक्षाकडून उपरोक्त संदर्भांकीत पत्रान्वये वारंवार कळविण्यात आले होते. परंतु अद्यापही बऱ्याच महाविद्यालयांनी शिक्षक आणि शिक्षकेत्तर पदांच्या संवर्गनिहाय बिंदूनामावल्या तयार करून प्रमाणित करून घेतलेल्या नाहीत. यावरून असे स्पष्ट होते की, आपणास वारंवार पत्राद्वारे कळवून व ताकीद देऊनही आपण विद्यापीठाच्या निर्देशाचे अनुपालन केलेले नाही. ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे.

तसेच महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ७ (२) नुसार राज्य शासनाच्या आरक्षण धोरणाची व यासंबंधी शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे अनुपालन करणे आपणास बंधनकारक आहे. राज्य शासनाच्या निर्देशानुसार मागासवर्गीयांना अनुशेष भरण्यासाठी मागासवर्गीय अनुशेष निर्धारित करणे आवश्यक असून यासाठी संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या संवर्गनिहाय बिंदूनामावली तयार करणे गरजेचे आहे. परंतु अद्यापही आपल्या महाविद्यालयाद्वारे दिनांक ०५/११/२००९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये तसेच २२/०१/२०१४ च्या शासन निर्णयानुसार शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या बिंदूनामावली तयार करून त्याची प्राथमिक तपासणी विद्यापीठाच्या मागासवर्गीय कक्षाद्वारे करण्यात येऊन, त्यास अंतीम मान्यता मा.सहायक आयुक्त, मागासवर्ग विशेष कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयाकडून न घेणे ही बाब राज्य शासनाच्या निर्देशाशी व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ७(२) मध्ये नमुद तरतुदीचा भंग करणारी आहे.

तसेच आपल्या निदर्शनास असे आणून देण्यात येते की, उपरोक्त शासन परिपत्रकान्वये संलग्नित अनुदानीत महाविद्यालये जो पर्यंत बिंदुनामावली सहायक आयुक्त (माववक) यांच्याकडून प्रमाणीत करून घेत नाही, तोपर्यंत अशा संस्थांचे पुढील अनुदान रोखण्यात यावे असे नमुद केलेले आहे. त्यानुसार अनुदानीत महाविद्यालयासंदर्भात मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयाकडे कार्यवाहीसाठी प्रस्तावीत करता येईल.

तेव्हा दिनांक ५ नोव्हेंबर,२००९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये विद्यापीठाशी संलग्नित सर्व अनुदानित, विना अनुदानित आणि कायम विना अनुदानित महाविद्यालये त्यांच्या येथील कार्यरत शिक्षक आणि शिक्षकेत्तर पदांच्या विषयावर आणि संवर्गावार बिंदूनामावल्या या पत्रावरील दिनांकापासुन १० दिवसाच्या आत उपकुलसचिव, मागासवर्ग विशेष कक्ष, यांचेकडे सादर करावी. जी संलग्नित महाविद्यालये शिक्षक आणि शिक्षकेत्तर पदांच्या बिंदूनामावल्या तयार करून दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ रोजीच्या शासन परिपत्रकातील पान क्रमांक ८ वरील प्रपत्र–अ नमुद नुसार कार्यवाही घेणार नाहीत अश्या महाविद्यालयांवर आरक्षण कायदा २००४ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कार्यवाही शासनाकडे प्रस्तावीत करण्यात येईल व याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयांच्या संस्था चालकांची आणि महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील. कृपया याची नोंद घेण्यात यावी.

ही सुचना ज्या महाविद्यालयांनी बिंदू नामावल्यांची तपासणी केली असेल त्यांचे करीता लागू नाही.

धन्यवाद!

(डॉ. विजय[illegible] इंगळे)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी माहितीस्तव सादर:
१)मा. सहायक आयुक्त, (मा.व.कक्ष) विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर
२)मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर.

# परिशिष्ट - तीन

## समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त



**पहिली बैठक**

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २३ सप्टेंबर २०१३ रोजी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

१. डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स., तथा समिती प्रमुख.

२. श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स.

३. श्री. पृथ्वीराज साठे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्री. जितेंद्र भोळे, उप सचिव

२. श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली :**

१. श्री. विनायक इरपाते, कुलसचिव

२. श्री. बा.स.राठोड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

३. डॉ. एन.एस.कोकोडे, डायरेक्टर, बीसीयुडी

४. डॉ. विजय सिल्हाटे, उप कुलसचिव, प्रशासन.

**विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर :**

(१) श्री. के. एन. के. राव, सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष)

सदर बैठकीत समितीने गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी विद्यापीठामार्फत राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिका-यांशी चर्चा केली.

## दुसरी बैठक

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक १० जून २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) श्री. बाळासाहेब सानप, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(३) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

(४) श्री. महेश चौघुले, वि.स.स.

(५) डॉ. तुषार राठोड, वि.स.स.

(६) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(७) श्री. सुरेश धानोरकर, वि.स.स.

(८) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

(९) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. राजेश तारवी, उप सचिव.

**विभागीय प्रतिनिधी :**

१. डॉ. संजय चहांदे, प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग.

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली :**

१. श्री. विनायक इरपाते, कुलसचिव

२. श्री. मोहन रामटेके, उप कुलसचिव

**समाज कल्याण आयुक्तालय :**

श्री. वि.आ. मोहतुरे, सहायक आयुक्त, समाज कल्याण, गडचिरोली.

सदर बैठकीत समितीने प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.



## तिसरी बैठक

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक ७ जुलै २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) श्री. बाळासाहेब सानप, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(३) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

(४) श्री. सुरेश धानोरकर, वि.स.स.

(५) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.

(६) श्री. भाऊसाहेब पाटील-चिकटगांवकर, वि.स.स.

(७) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

(८) श्री. रामराव वडकुते, वि.प.स.

(९) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. राजेश तारवी, उप सचिव.

**विभागीय प्रतिनिधी :**

१. डॉ. संजय चहांदे, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

२. श्री. प्रमोद नलावडे, सचिव, सामान्य प्रशासन विभाग.

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली :**

१. श्री. विनायक इरपाते, कुलसचिव

२. श्री. बा.स.राठोड, विशेष लेखाधिकारी

**समाज कल्याण आयुक्तालय :**

श्री. वि.आ. मोहतुरे, सहायक आयुक्त, समाज कल्याण, गडचिरोली.

सदर बैठकीत समितीने प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग; सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मागासवर्ग कक्ष) व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

**चौथी बैठक**

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २३ नोव्हेंबर २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. बैठकीत खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) श्री. बाळासाहेब सानप, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(३) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

(४) श्री. रामराव वडकुते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव

(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

समितीने प्रारुप अहवालावर विचार करून काही दुरुस्त्यांसह तो संमत केला.

शासकीय मुद्रणालय, नागपूर